# ''पतसंस्था परिवार'' च्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त

**पतसंस्था परिवार** ह्या 'मासिकाचा' १०८ वा अंक १९ नोव्हेंबर २००९ रोजी ९ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रसिध्द करीत आहोत. १३ नोव्हेंबर २००० साली पतसंस्था परिवार मासिकाचा पहिला अंक प्रसिध्द झाला. सर्वसामान्यांचे खऱ्या अर्थाने परमेश्वर, सहकार महर्षी, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील ह्यांच्या जयंतीचे औचित्य साधून, दादांच्याच सहकारातील आदर्शाला कुर्निसात करून ''**पतसंस्था परिवार**'' ह्या मासिकाची मुहुर्तमेढ झाली.

''**पतसंस्था परिवार**'' ह्या मासिकातील एकूण १०८ संपादकीय - अग्रलेखांचा मागोवा आजच्या वर्धापन दिनी घेणे क्रमपात्र आहे. यापूर्वीच्या १०७ अंकात ' सहकार व पतसंस्थांविषयी सर्वकाही' ह्या व्यतिरिक्त काहीही प्रसिध्द केलेले नाही. सहकार खाते / शासनाचे विविध जी. आर. आणि परिपत्रके / आदेश, सहकारी संस्था - कार्यकर्ते परिचय व कार्यक्रम ह्यांचीच प्रसिध्दी केली.

प्रत्येक महिन्यात वेळेवर पतसंस्था परिवार मासिकाचा अंक प्रसिध्द करून वर्गणीदार / वाचक / मान्यवरांपर्यंत पोहोचविला. केव्हाही खंड नाही. नियमितपणा हेच पतसंस्था परिवार मासिकाचे वैशिष्ठ आहे.

पतसंस्थांच्या बाबतित विविध मार्गदर्शनपर लेख, परखड विचार, आकडेवारी ''**पतसंस्था परिवार**'' च्या सर्व १०८ अंकात प्रसिध्द केली. वाचकांनी भरभरून उमेद दिली, सुचना केल्या. उभारी देण्याचे काम वाचकांकडून मोठ्या प्रमाणात झाले, ही पतसंस्था परिवारची जमेची बाजू आहे.

'**पतसंस्था परिवार**' च्या वर्धापनदिनानिमित्त महाराष्ट्र राज्याच्या मा.सहकार आयुक्तांना खालिल **मागणी पत्र** देत आहोत.

---

प्रति, १९ नोव्हेंबर २००९

**मा. सहकार आयुक्त व निबंधक,**
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय : कुठल्याही आर्थिक उपलब्धतेशी संबंधित नसणाऱ्या गोष्टींची कायद्याचा मान राखून त्वरीत अंमलबजावणी करणेबाबत...

महोदय,

आपण महाराष्ट्र राज्य सरकारचे संविधानानुसार अधिकृत मुख्य प्रतिनिधी म्हणजेच 'निबंधक' म्हणून काम करीत आहात. महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार सर्व अधिकार आपणास आहेत. आपणास मदत करण्यासाठी वॉर्ड, तालुका, जिल्हा, विभाग येथे निम्नस्तरीय अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार सुध्दा आपल्यालाच प्रदान केले आहेत. हे सर्व अधिकारी व कर्मचारी आपल्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली, अधिकाराखाली आणि नियंत्रणाखाली काम करतात. व तशी सहकार कायद्याच्या कलम ३ मध्ये स्पष्टपणे तरतुद आहे.

महाराष्ट्र राज्याचे **सहकार आयुक्त** म्हणून महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने संमत केलेला १९६० चा

सहकार कायदा हा आपल्यासाठी वैधानिक आधार आहे. राज्यातील संपूर्ण सहकार चळवळ, सहकारी संस्था व त्यामध्ये काम करणारे कार्यकर्ते व कर्मचारी यांची निश्चित स्वरूपाची जबाबदारी व अधिकारसुध्दा ह्याच सहकार कायद्याच्या आधारे ठरविण्यात आलेले आहेत. ही सर्व कामे करीत असताना आपल्या कार्यक्षेत्रातील व कार्यात कुठल्याही निर्णयाची अंमलबजावणी कायद्याला अधिन राहून करण्याची जबाबदारी सहकार आयुक्त म्हणुन आपल्यावरच आहे. अशावेळी भारतीय संविधानाचा **समानतेचा** अधिकार कोणालाही नाकारला जाणार नाही, यावर जाणीवपुर्वक लक्ष केंद्रीत करण्याची जबाबदारीसुध्दा राज्याचे सहकार आयुक्त म्हणून आपल्यावरच आहे.

परंतु राज्यातील बऱ्याच वेगवेगळ्या सहकारी संस्थांच्या बाबतीत सहकार कायद्याचा मापदंड दुजाभावाने वापरल्याची शेकडो उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ, पतपुरवठा करणाऱ्या सहकारी बँका व पतसंस्था यांचे बाबतीत धोरण अवलंबविताना व सहकार कायद्यानुसार नोंदणी झालेल्या **सहकारी साखर कारखान्यांच्या** बाबतीत धोरण अवलंबताना **सहकार आयुक्त व साखर आयुक्त** सहकार कायद्याचा अवमान करताना दिसतात. **किंबहुना आपण पारतंत्र्यात आहोत की काय ?** अशी भावना सहकार चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये वृध्दींगत होत चालली आहे.

किमान **५ ते १० वर्षे संचित तोट्यात** असलेल्या राज्यातील शेकडो सहकारी साखर कारखान्यांवर साखर व सहकार आयुक्तांनी सहकार कायद्याचे कलम ७८, ८३, ८८ लावून फौजदारी गुन्हे दाखल करून कोणालाही जेलमध्ये टाकल्याचे या राज्यात उदाहरण नाही. शेकडो साखर कारखान्यांनी ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून त्यांची वैयक्तिक लेखी संमती न घेता **देय नसलेल्या** आत्तापर्यंत हजारो कोटी रूपयांच्या रकमा थेट कपाती केल्या. आयुक्तांनी यथावकाश कायदा बासनात गुंडाळून या गैरकृत्यास काही वेळा अनेक ठिकाणी लेखी मंजुरी देवून या लुटमारीस प्रमाणपत्र देवून गौरवसुध्दा केला. परिणामी राज्यातील **लाखो ऊस उत्पादकांच्या हजारो कोटी रूपयांच्या बेकायदेशीर केलेल्या कपाती व ठेवी परत तर केल्या नाहीच, त्या ठेवींचे व्याजही दिले गेले नाही.** प्रत्येक कारखान्याच्या शासकीय वैधानिक लेखापरिक्षण अहवालात या **कपातीच्या रकमांबद्दल, ठेवी व व्याजाबद्दल हळुवारपणे शेरे उमटवले आहेत.** मा. आयुक्तांनी अशा **संबंधीत साखर कारखानदारांवर या क्षणापर्यंत लूटमार करण्याच्या कृत्यांबद्दल कारखान्यांची संचालक मंडळे का बरखास्त केली नाहीत ?** अशा संचालकांच्या **स्थावर - जंगम मालमत्ता का जप्त केल्या नाहीत ?** उलटपक्षी शेतकऱ्यांना बुडविणाऱ्यांना सरकारच्या तिजोरीतून **शेतकऱ्यांच्या हिताच्या नावाखाली अनुदाने दिली. कर्जाचे कालावधी वाढविले. व्याजाचे ठरलेले दर कमी केले. १०० रूपयांची वस्तु ३०० रूपयांनी खरेदी करून सुध्दा आणि ३०० रूपयांची वस्तू १०० रूपयांना विकूनसुध्दा आर्थिक गुन्हे विभागाकडे राज्यात एकाही साखर कारखान्यातील संचालकांवर गुन्हा दाखल केला नाही.** याचे उत्तर व भरपाई कोण व केव्हा करणार असा प्रश्न **शताब्दी** पुर्ण झालेल्या सहकारी चळवळीतील राज्यातील **कार्यकर्त्यांसमोर** आहे.

याउलट सहकारातील बँका व पतसंस्था यांचे बाबतीत आयुक्त मात्र सहकार कायदा आणि तोही बेजबादारपणे हाताळताना दिसतात. राज्यातील २५ हजार पतसंस्थांपैकी ४०० ते ५०० पतसंस्थांनी ठेवीदारांच्या ठेवी वेळेत दिल्या नाहीत, म्हणून छोट्या कार्यकर्त्यांना जेलमध्ये डांबले. त्यांच्या बँका व पतसंस्थांवर ७८, ८३, ८८ कलमाखाली कारवाई केली. व एकाच विषयासाठी २ सहकारी संस्थांना वेगळा मापदंड लावून **महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेला पायदळी तुडविले.** आणि याचा समाचार कोणीही घेवू शकत नाही, असा समज राज्याच्या सर्वसामान्य जनतेमध्ये कायम केला. **पैसा आणि सत्तेच्या जोरावर**

**सहकारातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांना दाबण्याचे काम सहकार आयुक्तांच्या माध्यमातून झाले**, हा इतिहास लोकांसमोर कोण मांडणार? व त्याची शिक्षा संबंधीतांना केव्हा होणार? हाच विचार **पतसंस्था परिवारच्या** ९ व्या वर्धापनदिनानिमित्त आमचे मस्तक सुन्न करून टाकते. यासाठी अनेकांनी एकत्र येवून सोईस्कर व स्वार्थापोटी खांद्यावर घेतलेली राजकिय पक्षांचे बेगडी कवच, तत्वासाठी झुगारून देवून निधड्या छातीने पुढे येण्याची गरज आहे. **१० हजार रूपयांची पतसंस्थेमधून ठेव वेळेत न मिळाल्यामुळे संचालकांना जेलमध्ये टाकले जाते , तसे १० हजार रूपयांची साखर कारखान्यांनी बेकायदेशीर कापलेली ठेव परत न दिल्याबद्दल साखर कारखान्याचे संचालक सुध्दा जेलमध्ये जातील.** त्याच वेळेला साखर व सहकार आयुक्त हे महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व नियम १९६१ यानुसार तंतोतंत काम करतात हे फुले, शाहू, आंबेडकर आणि छत्रपती शिवरायांच्या राज्यात सिध्द होईल, आणि तशी आम्ही मागणी करीत आहोत.

म्हणून मा. आयुक्तांना या अग्रलेखाव्दारे राज्यातील सहकारी साखर कारखान्यावर ज्या देय नसलेल्या कारखान्यातील शेतक–याला उसाच्या बिलातून शेतक–यांची वैयक्तिक लेखी संमती न घेता ज्या देय नसलेल्या कपाती केल्या, त्या कपाती मग त्या वर्गणी, देणगी, निधी, ठेवी किंवा अन्य कुठल्याही प्रकारच्या असो. **परंतु ज्या देय नाहीत त्या व्याजासहीत १ महिन्याच्या आत देण्याचे आदेश निर्गमीत करावेत, तसेच** सर्व संबंधित साखर कारखान्यांवर कलम ७८, ८३, ८८ खाली कारवाई चालू करुन **वर्षानुवर्षे संचित तोटयात** असणाऱ्या साखर कारखान्याच्या संचालकांवर झालेल्या **वैधानिक लेखापरिक्षणाच्या आधारे फौजदारी गुन्हे दाखल करुन** त्यांना जेलमध्ये डांबावे. आणि हे जर होणार नसेल किंवा वेळ काढूपणाचे धोरण मा. आयुक्त महोदय स्विकारणार असतील तर, **न्यायदेवता गप्प बसलेली नाही**. तसेच **जनता ही नेहमीच लाचार राहू शकत नाही. जनता ही नेहमीच लुटारुंना घाबरु शकत नाही. जनतेला नेहमीच अमिषाने व लुटलेल्या संपत्तीतून वश करता येणार नाही,** अशी वेळ निश्चितपणे येऊ शकते. आणि त्यावेळेस बरेच पाणी वाहून गेलेले असेल. कुठलीही सत्ता आणि पैसा न्यायव्यवस्थेपुढे टिकाव धरू शकणार नाही.

वरील सर्व कामे करण्यासाठी राज्याच्या आर्थिक बजेटमध्ये काहीही तरतूद करण्याची गरज नाही व राज्य सरकारची कुठल्याही लेखी परवानगीची गरज नाही. जो सहकार कायदा उपलब्ध आहे तो हे काम करण्यासाठी कुठल्याही आर्थिक उपलब्धतेशिवाय आयुक्तांसाठी पुरेसा आहे.

पुन्हा एकदा सत्य हे किती मर्मभेदी असते, फक्त ते अभ्यासपुर्वक, धाडसाने व योग्य वेळेत मांडावे लागते, ह्याची जाणीव आपणां प्रत्येकास भविष्यातसुध्दा होईल, ही अपेक्षा व्यक्त करून **पतसंस्था परिवार** १० व्या वर्षात आपल्या सर्वांच्या सहकार्याने, आर्शिवादाने, आत्मविश्वासाने व समर्थपणे वाटचाल करीन, ह्यासाठी प्रार्थना करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट !! जय सहकार !!!